५ एकांबरा—(एक+अंबर) एक आहे वस्त्र जीचें अशी. एक वस्त्र नेसणारी.

११ वप्र—तट.

१३ वर्त्री—वस्त्रें काढणारे. कोष्टी.

१५ मृगशाखमुखी—वानरमुख असे दूत.

२५ पिंगदृष्टि—पिंग—लाल आहे दृष्टि ज्याची तो.

४२ वत्सर—वर्ष.

४३ नृपेंद्रसुलीन—नृपश्रेष्ठांमध्यें अत्यंत लीन.

४५ श्रेणी—ओळ.

४९ बल्लव—आचारी.

५७ अम्लानत्वें—न सुकण्यानें.

५९ सारथी—श्रेष्ठ बुद्धीचा.

६२ सत्सूद—चांगला आचारी.

६५ ओक—घर.

६६ अंक—खूण.

६७ मूर्धाभिषिक्त—अभिषेक केलेले.

७० भूभुजाला—राजाला—विराटाला.

श्लोक.

७८ ज्या—धनुष्याची दोरी.

,, बुंथी—पदर, बुरखा.

८२ नर्तक—नाचणारा.

८५ विक्रम—पराक्रम.

,, गुण—धनुष्याची दोरी.

९५ नावेक—थोडा वेळ.

९८ प्रथित—प्रख्यात.

१०० अक्षरें—अक्षर (न नाश पावणारा.)

१०२ विग्रह—देह.

१०७ उजाळी—प्रकाशित करी.

१२२ बद्धपाणी—हात जोडून.

१२८ साकार—मूर्तिमंत.

,, मा—लक्ष्मी.

१३० वरासना—वर (श्रेष्ठ) आहे आसन जीचें अशी. श्रेष्ठ कुळांतली—मोठ्या पदवीची.

१३३ सैरंध्री—घरांतलीं कामें करणारी दासी. [चतुःषष्टीकलाभिज्ञा शीलरूपादिशालिनी । प्रसाधनोपचारज्ञा सैरंध्री परिकीर्तिता ॥]

१४३ प्रसुप्त—निजलेला.

,, क्षिप्र—लौकर.

१४६ तुंड—तोंड.

१४८ मळानें—पापानें.

१४९ परपाद—दुसऱ्याचे पाय.

१५२ विग्रहसेवकां—देहाच्या (माझ्या) दासींना.

१५३ परमराजरताशी—श्रेष्ठ राजस्त्रीसारखी.

१५९ शीलवंतजन—सदाचारसंपन्न मनुष्य.

अध्याय तिजरा. (पृष्ठें ५६-८०.)

३ किर—हुकर. वराहावतारास अनुलक्षून म्हटलें आहे. किंवा किर (अव्यय) निश्चयेंकरून.

श्लोक.

१३ कणपीक–धान्याचें पीक.

„ पीकदानी–पीकदाणी. थुंकण्याचें भांडें.

१६ चारुवक्री–सुंदरमुखी. (चारु–सुंदर. वक्र–मुख.)

२१ नग–अलंकार.

२४ सुरलोकपतीसरीचे–इंद्रासारखे.

२६ असक्त–(आसक्त) लुब्ध, वेडा.

२८ अरामा–(आरामाला) अरामा नसे–आराम नाहीं. सुख नाहीं. (आराम–बाग.)

„ मनोभिरामा–सुंदर.

२९ किंकरी–दासी.

३१ खंजनाक्षी–खंजनपक्ष्याप्रमाणें आहेत डोळे जीचे ती. (खंजन–ताजवा.)

४३ प्रतिभा–तेज.

५० सद्रुप–रूपवान्.

„ नीची–खालीं.

५२ कांचनभास्वता–सोन्याप्रमाणें तेजस्वी.

„ भास्वतातें–भास्कराला (सूर्याला.)

५४ कुश्चळ अंगनाहो–कुरूप नवरा.

६४ डावलि–चुकविते. (डावलणें–चुकविणें.)

६६ गुप्तभेषी–गुप्तवेष धारण करणारे.

६७ जवें–वेगानें.

६९ धरणीधरीं–राजांनीं (विराट व धर्म या दोघांनीं.)

७१ खळालिलेतें–खळाच्या लीलेतें. दुष्टाच्या वर्तनाला (धिक्कारिती.)

७२ कुचाळी(वि०)–कुचाळी (वाईट चाळे) करणारा.

„ कुचाळी (क्रि०)–कुचाळी केली. थट्टा केली.

श्लोक.

७३ महीपात्त–पृथ्वीवर पडणें.

७७ चुकुर–घाबरी.

„ नयनाब्जीं–नेत्रकमळीं.

„ कांतीं–नखप्यांच्या ठिकाणीं.

८० कृष्णकची–कृष्ण (काळे) आहेत कच (केश) जीचे अशी.

„ शचीसम–शचीसारखी. शची–इंद्रपत्नी, इंद्राणी.

८६ लाहावया–लाधावया–पावण्यास.

८७ बहा–बोलवा.

९१ दर्प–गर्व.

९२ वीकसी–विकासी (फुलवी).

९६ जगजीवनाशी–सर्वजीवसंहारक परमेश्वर (जग+जीवन+अशी, अश्=खाणें.)

१०७ कशीतों–कसून पाहतों. परीक्षा करून पाहतों.

„ सुकशी–उत्तम कसाची.

१०८ कपिआसना–कपि (मारुति) आहे आसन (वाहन) ज्याचें अशा रामचंद्राला.

१०९ मंदरां–मंदराचळ पर्वतासारखे जे पराक्रमी अशा तुझ्या पतींना.

११० हाणी–(हानि) कमीपणा.

११२ नीरवाहे–(निर्वाह) टिकाव, निभाव.

१३१ भद्रा–कल्याणकर्त्री.

१३२ जीतो–जिंको.

„ चित्रगाने–चित्रासारखे.

१३४ ओक–टाक.

„ ओक–ओकारी.

„ दीन–दिवस.

„ दीन–गरीब.

श्लोक.

१३४ नदीन–समुद्र. (नदी+इन=नदी+प्रभु, स्वामी).
१३५ खळमर.भीमा–दुष्ट, माजलेला आणि भयंकर असा जो कीचक त्याला.
१३६ जितेंद्री–(जितेंद्रिय) इंद्रियें जिंकणारे.
१४३ कटा–हाय हाय!
१४५ राजकी–(राजकीय) राजाचा.
,, मुखरणी–(मुखरीण) मुख्य.
,, जगतींतलीया–पृथ्वीवरच्या (स्त्रिया).
१४७ सारसाक्षी–कमलनेत्री (सारस–कमल).
,, त्वच्चित्तकासार–तुझें मन हेंच कासार (सरोवर).
१५० दानवारी–दान दिल्याचें पाणी. (वारी= पाणी)
१५४ गिरामळ्याचा–दुष्टभाषणाचा.
१५७ आहे–ताप.
१५८ माचा–लक्ष्मीचा.
१६२ रती–रतीभर, रेसभर, थोडा देखील.
१६४ नरकेशासम–यमासम.
१६९ अंबु–पाणी.
१७९ रणांतक–रणांत अंत करणारी अशी.
१८० न ले–घातलें नव्हतें.
१८१ कुसुमुसी–धुसफूस करूं लागला.
१८६ कोंभ–मोड.
१८९ रमी–(रमा) लक्ष्मी.
१९४ मलिनांबरी–मलिन वस्त्र नेसणारी.
२०२ बुद्धिपाषाण–बुद्धीनें दगड.
२०३ भाजे–स्त्रियेला (भाजा–भार्या–स्त्री.)
२०४ राति–रात्र.
,, वाट–वाबट.
२०७ नीकरानें–(निकरानें) जोरानें.
,, किंतु–संशय.
२०८ आळवी–प्रार्थना केली.

श्लोक.

२१० दिव्येक्षणी–दिव्य (सुंदर) आहेत ई-क्षणें (नेत्र) जीचीं ती (द्रौपदी.)
२१४ अक्षमानें–आंसासारखीं (बळकट.)
२१९ कृष्णनिशींत–काळोख्या रात्रीं (निशा =रात्रि.)
२२० लाचावुनी–नादीं लागून, वेडा होऊन.
२२१ भंबाळसे–(बंबाळ) मोठे. अकटोविकट.
२३४ उबग–कंटाळा, निष्काळजीपणा.
२६६ नाभिनाभि–भिऊं नको.
२३७ निरविती–देती, चिंमळाला निरविती– अग्नींत टाकलें.
२४५ क्षपा–रात्र.
२४६ विशाळकबरी–विशाळ आहे कबरी (वेणी) जीची अशी द्रौपदी.
२४७ लांव–राक्षसी.

अध्याय चौथा. (पृष्ठें ८०–८५.)

२० खळध्वंस–दुष्टांस ठार मारणें.
२५ वार्तिक–बातमीदार.
३९ द्रौपदीमानसाचे–द्रौपदीच्या मनाचे; (पक्षीं) मानस सरोवराचे.
४२ तुकाला–तुळनेला, बरोबरीला.
५५ वामला–खिन्न झाला.

अध्याय पांचवा. (पृष्ठें ८५–९९.)

११ पालाणिजे–घ्यावें.
१९ कराळा–(कराला) भयंकर.
२२ करवाळ–तरवार.
२९ माव–माया, कपट, योजना.
३० सावडी–गोळा करी.
३३ निचडा–अत्यंत.
,, खस्त केला–ठार मारला.
४१ दामग्रंथि–दाव्याची गांठ.
५९ थीरे–स्थीर होई.

श्लोक.

७० जीवणें–जगणें.
८५ मोहरी–मोहून घेई.
९९ एकपत्रें–एका बाणानें.
१०१ बुजविन–भिववीन.
१०२ आघवा–सगळा.
१०३ निर्भंग–ज्याला भंग (नाश) नाहीं असा.
,, तोरा–गर्व.
१०७ नीभळासा–नेभळासा.
१०८ दूसरीची–सुंदर.
१०९ नीभली–(निभली) निभावली. पार पडली.
११६ उदित–तयार.
१२४ हयरज्जू–घोड्यांचे लगाम.
,, न खमला–खमला नाहीं, रुचला नाहीं.
१२५ लेखिला–मानिला.
१२८ कशी–बांधी.
१३५ द्वंद्व–युद्ध.
१३६ शरउबाळा–बाणांचा भडिमार.

अध्याय सहावा. (पृष्ठें ९९-११८.)

१ भवउगावा–संसाराचा उलगडा, संसारापासून सुटका.
,, लगामीं–ताब्यांत.
,, चिदचि–(चिद् चि) ईश्वरस्वरूप.
५ भाती–शोभतात.
११ फरे–रांगा.
१५ विकासिता–फुलविणारा.
२१ नीर–पाणी.
,, नीरसा–(नीरस) रसहीन.
२४ उठावे–उठावण्या.
२९ वोप–(ओप) तेज.
,, द्विपज्जन–शत्रु.
३४ शीणशी–(शिणशी) श्रमतोस.
३६ मज्जीवना–माझ्या जीवाला.

श्लोक.

४९ अवलंब–स्वीकार.
६० उद्दाम–तेजस्वी, भव्य.
६१ वामला–ओशाळला.
६७ वेंधला–चढला.
७३ कार्मुकी–धनुष्यसंबंधी.
७७ मार्तंडतुकें–सूर्यासारखे.
७९ मुक्ताभ्रसा–मुक्त (गेलीं) आहेत अभ्र (ढग) ज्यापासून त्या (सूर्या) सारखा.
८४ उपाणी–स्पष्ट करून सांगणें.
८५ उपणितां–स्पष्ट करून सांगितली असतां.
९५ अजयमरुत–पराजय हाच वारा.
९८ घन–मोठें.
१०२ नाकेश–इंद्र. (नाक+ईश) नाक–स्वर्ग.
१०३ भोयराजा–पृथ्वीपती.
,, संसृतिलोभ–संसाराचा लोभ.
,, वारे–नाहींसा होतो.
१०५ दार्पी–दावतों.
१०६ द्विषद्वार–शत्रूंचा समुदाय.
,, दिग्दहा–दिशा दहा. (दहा दिशांला शत्रूंस पळवून लावतों–असा भाव.)
१०७ मद्धस्तिचा–माझ्या हातचा. (मत्+ हस्त.)
१११ रिपुसीतसें–शत्रु हीच थंडी.
११२ साक्षी–पाहणारा.
,, विषमीं समीं–समविषम (बऱ्या वाईट) काळांत.
११३ खांडवीं–खांडववन अग्नीला भक्षण करावयास दिलें त्या वेळीं.
११४ बूजवीलें–(बुजाविलें) भिवविलें.
,, ले–घाली.
११५ दिठी–दृष्टि.

श्लोक.

११५ मत्तरासी–माजलेल्या (वीरांचे) समुदाय.
११९ शदा–प्रेतःसारखी.
१२९ खवाया–लागण्याकरितां.
१४० वेदक्रमासी–वेद व क्रम यांना.
१४२ लभाया–(लाभाया) मिळण्याला.
,, कुडें–वांकडें.
१४३ खासदार–दुसऱ्यावर उपजीवन पावणारा (निंदाद्योतक).
,, न राजे–शोभत नाहीं.
,, वलगसी–वडबड करतोस.
,, नर–अर्जुन.
१४६ गुरुवंचकी–गुरूला ठकवणारा.
१४९ गुरुनिंद–(गुरुनिंदा) गुरूची निंदा.
१५० ज्यारीपरी–जारिणीप्रमाणें.
,, द्वंद्व=भांडण.
१५१ हवीला–हवन केला, भस्म केला.
,, तुला–तुलना.
१५२ न दीज–न देई.
१५४ वीखरे–(विखरे) फांकाफांक होईल.
,, चक्रधैर्या–सैन्याला धीर येण्याकरितां.
१५७ दायादतोरा–शत्रूंचा गर्व. पांडवांचा गर्व. दायाद–ज्यास दाय (वांटणी) मिळते असा नातलग.
,, हवी–भस्म करी.
१६७ गोवा–गुंतागुंत.
१७१ थीरवीतों–स्थीर करतों.
१७२ धृति–धैर्य.
,, गाढ–अत्यंत.
,, कलवी–हळमळवी.
१७३ दहिल–(दाहील) भस्म करील.
१७५ ठिवी–(ठेवी) ठेविलें.

श्लोक.

१७५ द्विषन्मोहिनीच्या–शत्रूला मोह उत्पन्न करणाऱ्या (सैन्या)च्या.
१८२ दाव–(दावा) भांडण.
१८३ आव्हरा–गांवाच्या सीमेला.
,, आशिष–आशीर्वाद.
,, सहव्यास–आनंदानें.
१८६ कावी–कावणारा, संतापणारा.
१८८ निमिष्य–(निमेष) पापणीस पापणी लागेपर्यंत जाणारा काळ.
१९० नभस्फोट–आकाश फोडणें.
१९३ परिछिन्न–साफ.
,, वाव–व्यर्थ.
१९४ शेखीं–शेवटीं.
२०० दयसागर–दयासागर.
२०१ वित्पती–(व्युत्पत्ति) भाषा आणि शास्त्र यांचें ज्ञान.

अध्याय सातवा. (पृष्ठें ११८-१३९.)

३ स्फूर्तितुषार–स्फूर्तीचे तुषार. (सुचणें.)
८ फळी घे–लढाई करावयास उभा राही.
९ अपाये–(अपाय) विघ्न.
११ रणवटी=रणांगण. रणभूमि.
१७ उगला–उगाच.
२० धनुष्यंत–धनुष्य धारण करणारे.
२५ तगावा–रक्षण.
२८ नीरवी–(निरवी) दिला.
३१ उहुळल्या–उपळल्या.
३७ केतूस–ध्वजावर.
४० गोठी–गोष्ट.
,, बाहे–भुज.
४३ व्याहळीला–अरण्याला–अरण्यांत. हा कुरु व्याहळीला पातला. म्हणजे

श्लोक.

हा कुरु आडरानांत शिरला, ह-
हास पेटला-असा अर्थ.
५३ असल्कर-घात करणारा.
५५ शिलेटोप-चिलखत.
६१ चर्कटोनि-गोंधळून (चरकटोनि).
„ ताळापरी-ताडाप्रमाणें.
६८ गोता-अपजयाची वेळ.
८८ परत्रास-परलोकास.
९१ चांचरे-भिऊन आई.
९३ वारधी-समुद्र. (वारिधि).
९४ पाये-(पावे) पावला.
१२० विसर्जी-सोडतो.
१२५ कसोनी-कसास लावून.
१२६ अर्णव-समुद्र.
१३६ मातल्या-मातणाऱ्याला.
१३७ ढाळुनी-टाकून.
१४१ संधींत-मर्मस्थळीं.
१५४ वाणकी-लहान.
१६६ वृत्रारी-इंद्र. (वृत्रासुराचा शत्रु.)
१६८ काळवतसा-काळासारखा. येथें द्वि-
रुक्ति झाली आहे. 'वत्' व 'सा'
हे दोन्ही एकार्थक प्रत्यय लागले
आहेत.
१७३ करिकेतन-श्रेष्ठ हत्ती.
१७५ उफलुनि-काढून (भात्यांतून).
„ मुकुटपट-मुकुटावरील आच्छादन
किंवा मुकुट आणि पट (वस्त्र).
१७७ मनाना-हाहाकार.
१७८ पवाहे-वाहूं लागली.
१७९ स्तब्धला-स्तब्धला. क्रियाविशेषणा-
पासून किंवा भूतकालिक विशेष-
णापासून क्रियापद साधलें आहे.
१८२ तां-(त्वां) तूं.

श्लोक.

१८३ डावलाविला-घालविला, बुडविला.
(डावलणें).
१८६ रवाचे शरीं-शब्दबाणांनीं.
„ दग्धवीलें-दग्ध केलें, जाळिलें.
१८८ मोहरावली-लढाईस तयार झाली.
„ हरावळ-पिछाडी (सैन्याची.)
१९१ मोहनदशा-मोह पावण्याची स्थिति.
„ नासक्त-(न+आसक्त) जो आसक्त
(लुब्ध) झाला नाहीं तो.

अध्याय आठवा. (पृष्ठें १३९-१५६.)

१ प्रजळला-प्रज्वलित झाला, पेटला.
३ सत्कथीं-सत्कथेंत (आकारांत श-
ब्दाचें हें चमत्कारिक रूप आहे.)
„ संपती-(संपत्ति) द्रव्य.
„ पुरकरां-नगरवासी जनांना.
११ जिणुनि-जिंकून.
१२ व्रद्धपतगा-मावळणाऱ्या सूर्याला.
१५ सुधाभूप-सुधेप्रमाणें सुख देणारा
राजा.
१६ कहरी-कहर करणारा.
१८ मंथुनि-ढवळून.
२६ गंतव्य केलें-गेला.
२७ छेळीत-टोंचितो. (छेळणें-टोंचणें.)
„ शाली-शोभणारा, तेजस्वी.
„ यशी-यशस्वी.
३१ आजमावा-लक्षांत आणावा, अजमास
करावा. (अजमावणें.)
३३ लेखता-लेखणारा, पर्वा करणारा.
३५ धृतितंतु-धैर्याचा दोरा.
३६ नमस्कारिला-नमस्कार केला.
६० क्षमण-क्षमा.
६१ श्रवणुनि-श्रवण करून.

श्लोक.

८८ चित्सिंधूसी–चित्स्वरूप परमेश्वर याच सिंधुनदाला.

,, भरतवर–भरतकुलामध्यें श्रेष्ठ.

,, पंचनद–पांच पांडव ह्याच पंजाबांतील पांच नद्या.

,, निर्द्वंद्वसमया–ज्या ठिकाणीं द्वंद्व (द्वैतपण किंवा कलह) नाहीं अशा त्या वेळाला.

८९ कसी–कसास लावी किंवा बांधी.

९६ तुरें–वाद्यें.

९८ चाह–आवड.

१२५ राटमणि–राजश्रेष्ठ.

१२६ आळ–आरोप.

,, सीसां–डोक्यावर.

१३२ बोधकवाडें–बोधरूप दरवाजे.

स्थालीपाक. (पृष्ठें १५६-१५७.)

१ स्फुट–व्यक्त, स्पष्ट, मोठ्यानें.

३ धरधरा–धर (गोवर्धनपर्वत) धारण करणाऱ्या.

५ सुभाव–दृढभक्ति.

,, विंधिला–निशाण मारून विद्ध केला.

,, उरा वरि–उरास वरिता झाला.

६ खेचरी–गरुड, ख (आकाश) त्यामध्यें चरी गमन करणारा, त्वरायुक्त म्हणून ज्याचा पाय भूमीला लागत नव्हता असा गरुड.

,, केसरी–सिंह.

भीष्मयुद्ध. (पृष्ठें १५७-१६०.)

१८ वैखरी–वाणी.

२० संश्रुतिसार–वेदांतलें रहस्य.

भीष्मशरपंजर. (पृष्ठें १६०-१६४.)

५ प्रसरति–प्रसार पावले, उपयोगी झाले.

श्लोक.

७ नियम–दररोज हजार रथी मारल्यावांचून धनुष्य खालीं ठेवायाचें नाहीं हा भीष्माचा नियम.

१२ उद्दाम–उंच.

१६ जळपावें–रागवावें, तडफडावें.

१७ अमल–स्वच्छ. (मलरहित).

,, प्रकर्षे–उत्कर्षें. (उत्कृष्टपणानें).

२२ बाणसरसी–बाणाबरोबर.

,, शरतल्पीं–बाणांच्या पलंगावर.

२६ भाती–शोभतात.

जयद्रथवध. (पृष्ठें १६४-१६७.)

२ स्वापमानें–आपल्या अपमानानें (स्व+अपमान.)

७ यदर्थ–ज्याच्याकरितां. (यत्+अर्थ.)

९ सव्यापसव्यकृतसायकतांडव–(सव्य–डावा. अपसव्य–उजवा. कृत–केलेला. सायक–बाण. तांडव–नाचणें. सव्यापसव्य (द्वंद्व) सायक. तांडव (ष०त०) सव्यापसव्यकृत कर्मधा०) सव्यापसव्य कृत आहे सायकतांडव ज्याचें तो.) दोन्ही हातांनीं सारखे बाण मारणारा (अर्जुन).

११ वापी–विहीर.

१२ आर्द्रपृष्ठ–आर्द्र (ओली) आहे पृष्ठ (पाठ) ज्यांची ते (घोडे.)

१४ कोपनिभृत–अत्यंत रागावलेलें.

,, स्वाकृष्टचाप–हातांत धनुष्य धरणारे.

१८ स्वतिलकीकृत–आपण पूज्य मानलेला.

१९ क्लिष्ट–दुःख देणारें.

२१ धाकलास–न्यायलास.

श्लोक.

२१ सजावें—करावें.

,, खिजावें—चिडावें.

२६ प्रमोदभरदीपक—आनंदाचा भर हेच दिवे.

पार्थभाग्य. (पृष्ठें १६८-१६९.)

१ रतीं—रतिप्रसंगीं.

,, नखचंद्रीं—नख हाच चंद्र त्याच्या योगानें. (चंद्राच्या शीतळपणाकडे लक्ष आहे.)

५ चिज्जडसंगमातें—चित् (जीव) व जड (शरीर) यांच्या संगमाला. यावजीवांना.

७ स्वेद—घाम.

शुकरंभासंवाद. (पृष्ठें १६९-१७१.)

९ कैसेन—कशाच्या योगानें.

११ प्रेमसंवाद—प्रेमाचें भाषण.

दंपत्यचरित्र. (पृष्ठें १७१-१७३.)

३ रम्य—सुंदर.

,, सजळ—जळासहित, पाण्यानें भरलेला.

६ आद्यशक्ति—मूळशक्ति.

८ सुहृदकुळिंचा भाव—मित्रभाव. (श्लो० ७-८ ही धर्मोक्ति आहे.)

१५ श्रीकांत—लक्ष्मीपति.

,, भक्तजनवत्सल—भक्तजनांविषयीं दयाळु.

शुकाष्टक. (पृष्ठें १७३-१७५.)

५ सजावें—असावें, व्हावें.

६ उपेक्षिल—टाकील.

७ वासना—इच्छा.

,, शुकोक्त—शुकानें सांगितलेला. केवळ निरपेक्ष अशा ईश्वरभक्ताला जगांत कांहीं कमी पडावयाचें नाहीं. त्याचा भार ईश्वरावर पडतो. परंतु जो इच्छा धरून ईश्वराची भक्ति करतो, त्याचा भार ईश्वरावर पडत नाहीं—असा भाव.

९ भिक्षाशनादि—भिक्षा+अशन+आदि=भिक्षा मागून खाणें इ०

,, असोशी—हावरेपणा, विशेष इच्छा.

१० भोगवांछा—भोगांविषयीं इच्छा.

,, मति पहिली—पूर्वजन्मींचा बुद्धिसंस्कार.

,, सहनता—सहनशीलपणा.

,, सत्सदन्नादि—(सत्+सत्+अन्न+आदि) चांगलीं चांगलीं अन्नें वगैरे पदार्थ.

,, द्विधा—दोन प्रकारांनीं.

,, उदास—विरागी.

दशावतारचरित्र. (पृष्ठें १७५-१७६.)

२ मंदर—मंदरनामक पर्वत.

३ रसातळगामी—पाताळांत जाणारी.

ध्यानमाळा. (पृष्ठें १७६-१७८.)

३ प्रक्षालितां—धुतले असतां.

४ जानुवरि—गुडघ्यावर.

६ नाभीऱ्हदीं—नाभी (बेंबी) हेंच ऱ्हद (सरोवर, डोह) त्यांत.

,, जगदंबुज—जगद्रूप अंबुज (कमल).

१२ सस्नेह—स्नेहानें युक्त.

,, प्रेमप्रसाद—प्रेम हाच प्रसाद.

१३ अशेष—सर्व.

,, भवशोकसमुद्रवारी—संसाररूप शोकसमुद्राचें पाणी.

विष्णुध्यान. (पृष्ठें १७९-१८१.)

१ असंग—निःसंग, ज्यांनीं संग सोडला आहे ते.

श्लोक.

१ किरीट–किरीटासारखें, वंद्य.
८ हास्यलवें–थोड्या हांसण्यानें.
,, अंबुजकानन–कमळांचें वन.
१२ उदयार्क–उदयकाळचा सूर्य.

भूगोलवर्णन. (पृष्ठें १८२-१८८.)

१ तो आत्मत्व वंचला–तो आत्मत्वाला ठकला. त्याला आत्मत्व कळत नाहीं.
२६ अन्यत्र–दुसऱ्या ठिकाणीं.
,, मोक्षप्रदत्व–मोक्ष देण्याचा गुण.
,, जन्मांतरीं–अन्यजन्मीं.

नामसुधा. (पृष्ठें १८८-२४५.)

अध्याय १ चरण १. (पृ० १८८-१९५.)

४ सुवर्णी मुद्रा–उत्तमवर्णयुक्त अशी मुद्रा.
७ श्रवणपठनमात्रें–श्रवण (ऐकणें) आणि पठन (वाचणें) यांच्या योगानें.
९ सगुण–सगुणनामाच्या भजनानेंच मुक्ति मिळते. [कर्मतत्व–अ० १ श्लो० २७-२८.]
१० तेंही–कोणत्याही कारणानें नारायण शब्द उच्चारणारे [अ० २ च० १ श्लो० २४-२८.]
१२ तत्करुणांबुवृष्टी–त्याच्या करुणारूप अंबूची (जलाची) वृष्टि.
१४ वृष्टी–अध्याय १ चरण ३ श्लोक १६ पहा.
२० भीष्मोदित–भीष्म+उदित=भीष्मानें+सांगितलेलें.
२३ मुनिवर्यगेयें–मुनिश्रेष्ठांनीं गाण्यास योग्य अशीं.
२६ स्फुरद्रूप–स्फुरण पावणारें रूप.
३० अलंकारनामें–अलंकाराच्या नांवानें.

श्लोक.

३० विष्णुनामें–श्लोक १७ यांत वर्णिलेलीं नामें.
,, दुःखधामें–दुःखाचीं घरें. (श्लोक १६ या पूर्वार्धांत वर्णिलेलीं.)
३५ तृणादिराशी–तृण आदिकरून पदार्थांचे ढीग.
३६ कुमार्गप्रवृत्ती–वाईट मार्गाच्या ठिकाणीं प्रवृत्ति (शिरकाव).
३७ अनिच्छेकरुनी–इच्छा न करितां.
३८ आठवाच्या–आठवणीच्या.
३९ अहं शब्द–'अहं' हा शब्द, मीपणा.
४६ पापकुळें–पापाचीं कुळें–राशी.
५३ सर्वात्मतें करुनि–अशेष आत्मभावेंकरून. [अ० ३ च० २ श्लो० ३० पहा.]

अध्याय १ चरण २. (पृ० १९५-१९८.)

१ छायात्मविश्रांतिची–आत्मविश्रांतीची छाया. (आत्म्याला विश्रांति होईल अशी छाया–टीका.)
,, श्रवणोदरांत–श्रवण (कान) हेंच उदर (पोट) त्यांत.
,, अलसें–आळसानें.
२ जननरकनिपातें–लोकांच्या नरकांत पडण्यानें.
४ नरकनामकअग्नितापा–नरक नांवाच्या अग्नीच्या तापाला.
८ प्रवृत्तिरचना–संसाराची घडामोड.
१० गजशौचरूपा–हत्तीच्या पवित्रपणासारखी. सातव्या श्लोकांत या पवित्रपणाचें वर्णन आहे.
११ पापमूला–पापाचें मूळ अशी जी (अविद्या).

श्लोक.

१२ भगवदर्पणकर्मयोगें–कर्मतत्व अ० १ श्लो० ११-१६ पहा.

,, पापें–येथें पाप आणि पुण्य या दोहोंस पाप शब्द लाविला आहे. [अ० ३ चरण ३ श्लो० १५].

१५ हरिदासधर्में–श्रीकृष्णाचें दास हाच धर्म त्याच्या योगानें.

१६ गीर्वाणवाणी–संस्कृतभाषा.

१८ साधनमात्र गमे उणें–नामापेक्षां सकल साधनें उणीं होत. [प्रायश्चित्त–अ० २ च० १ श्लो० ३०; व्रततीर्थतपें–अ० २ च० २ श्लो० १८; गंगा–अ० २ च० ४ श्लो० ३५; वैदिकयज्ञ–अ० ३ च० ३ श्लो० १७.]

२० सुतमिषें–पुत्राच्या निमित्तानें.

अध्याय १ चरण ३. (पृ० १९९-२०२.)

४ जरठ–म्हातारा.

५ नारायणाख्य–नारायण नांवाचा.

१० खाद्य–खाण्याला योग्य पदार्थ, खाऊ.

१६ अघझोंपडी–पाप हीच झोंपडी. (संस्कृतप्राकृत शब्दांचा समास केला आहे.) अ० १ च० १ श्लो० १४ पहा.

१८ करुणालय–करुणेचें (कृपेचें) आलय (घर) असा.

२३ भोगिती–क्रियमाण (कर्मतत्व अ० १ श्लो० ४९) आणि संचित (कर्मतत्व अ० १ श्लो० ५०) ज्ञानप्राप्तीनें नष्ट होतात. परंतु, प्रारब्ध (कर्मतत्व अ० १ श्लो० ५१) जीवन्मुक्त भक्तासही भोगावें लागतें.

२४ तदंतीं–त्या (आयुष्याच्या) शेवटीं.

श्लोक.

२५ मोहला–मोह पावला.

२८ न माती–न मावती, आंत न राहती, दांत मुखाबाहेर आले होते.

३० लिंगदेह. 'दशेंद्रिय[1] तन्मात्रापंचक। ऐसीं पंधरा मन एक। मिळोनि षोडशकलात्मक। लिंगदेह ॥.' वामन–निगमसार अ० ३ ओं० ६२.

,, स्थूळदेह–'प्रारब्ध रूपें शरीरें केलीं। पंचभूतांचीं निर्मिलीं। तीं हीं स्थूळें ॥.' वामन–निगमसार अ० ३ ओवी ६१.

३२ किंकर–चाकर.

अध्याय १ चरण ४. (पृ० २०२-२०५.)

३ दिगंततम–लांबलांबचा काळोख.

९ तृषार्तचित्तें–तान्हेल्या मनानें, आर्तमनानें, उत्कंठित मनानें.

१६ विचळला–वेडा झाला.

अध्याय २ चरण १. (पृ० २०५-२११.)

१ वैकुंठ–भृंग–विष्णुदूत.

,, मुनींद्र–शुक.

,, रायाप्रती–परीक्षितीला.

८ श्रीकत्रयी–भागवत–स्कं० ६ अ० २ श्लो० २।३।४.

,, शासनदंडधर्तें–शासनाधिकारावर नेमिलेले.

,, होवूनि–असून.

,, हे–यमधर्मादिक.

,, नीतिकर्ते–नीतिमान, नीतीनें वागणारे.

१० कृतपापफळें–केलेल्या पापाच्या फळानें.

---

१. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध.

श्लोक.

१४ स्ववदनसदनीं–आपलें तोंड हेंच घर त्यामध्यें.

१५ वाखाणिती–बोलती.

२२ तद्विषया मती–याचे अर्थ दोन होतात:—१ रमापतीबुद्धिस विषय होय (होतो); २ बुद्धि हरिविषय होते (म्हणजे बुद्धिच हरिरूप होते). पहिल्या अर्थाचा उल्लेख श्लोक १९ यांत केला आणि दुसऱ्या अर्थाचा उल्लेख श्लोक २२ यांत केला. यांतील अजामिळकथेंत दुसरा अर्थ सिद्ध होतो, म्हणजे त्याचे बुद्धिस रमापती विषय झाला नव्हता. त्याचे मनास ईश्वराचा बोध झाला नव्हता–तर त्याची बुद्धिच स्वतःशुद्ध म्हणजे ईश्वररूप झाली होती.

२९ हा–हा पूर्वपक्ष श्लोक २४ यांत उपस्थित केला आहे. आणि त्याचें समाधान श्लोक २५।२६।२७।२८ यांत केलें आहे. अ० १ च० १ श्लोक २५ पासून श्लोक ३२ यांतही याच पूर्वपक्षाचें समाधान आहे.

,, आणीकही–प्रायश्चित्तादिक साधनें.

३२ तदुपरि रचितांतें–त्याउपर शुद्ध रचना झाली आहे ज्याची अशा अंतःकरणास.

,, विष्णुधामें–विष्णूनें धारण केलेलीं. अ० १ च० १ श्लो० १७ यांत सांगितलेलीं. या ग्रंथांत या अर्थानें हा शब्द वारंवार योजिला आहे.

श्लोक.

३६ तदनु–त्यानंतर, हरिकटाक्षें–प्रभूनें कृपादृष्टी केल्यामुळें, गुणि–नामानें सुचविलेले जे हरीचे गुण त्या गुणाचे ठिकाणीं. या श्लोकाचे अर्थाचा अनुवाद अ० २ च० २ श्लो० १ यांत केला आहे, आणखी अ० १ च० १ श्लो० १४ व त्याच अध्यायाचा च० ३ श्लो० १६ पहा.

३७ अर्थ–नारायण इत्यादि नामाचा अर्थ. उदाहरणार्थ श्लो० ३८ ते ४२ व ४४।४५ पहा. अ० २ च० २ श्लो० ६२।६३ पहा.

४१ नारांसी ज्याचा आश्रय तो नारायण. आणि नारांचा ज्यास आश्रय तो नारायण असा नारायण नांवाचा अर्थ सांगितला. नारांस आश्रय तो ईश होय. नारांच्या आश्रयानें राहणारा तो जीव होय. घट आकाशाचे आश्रयानें असतो आणि घटाचे आश्रयानें (घटांत) आकाश असतें. हा ईश आणि जीव यांचा भेद नारायणनामानें बोधित झाला.

४३ विमुक्तजनआश्रय–मुक्त जनांला आश्रय देणारा (असा).

,, हरिचीं नामें–दोन प्रकारचीं:–१ ज्ञानगम्य त्यांचा अर्थ गहन. त्यांतील नारायण नामाचा एक अर्थ श्लोक ३८।३९।४०।४१।४२ यांत सांगितला. या नारायण नामाचे बहुत अर्थ आहेत. २ गुणकर्मधामें जीं नामें त्यांचा अर्थ सुगम, त्यांपैकीं कांहींचा अर्थ श्लो० ४४।४५ यांत सांगितला.

श्लोक.

४४ भूभारांतक–पृथ्वीच्या भाराचा अंत करणारा.

४७ प्रथितार्थ–एकंदर केलेला अर्थ, तात्पर्यार्थ.

४९ चित्ताकाशीं–चित्तरूप आकाशांत.

अध्याय २ चरण २. (पृ० २११-२१७.)

१ वदले–अ० २ च० १ श्लो० ३६ पहा.

२ प्रसक्ती–आसक्ती, आवड.

११ हरिगुणअनुवादी–हरिगुणांचा अनुवाद करणारे.

,, पापवारा–पापाचा वारा (संस्कृत प्रा० श० स०.)

१४ परिहरुनि–नाश करून.

१७ मथितार्थ–तात्पर्य.

,, कसेपरि–कशाही रीतीनें, समजून, न समजून, पुत्रादिकांचे नांवानें, थट्टेनें, निंदेनें, दंभानें, पोट भरण्यासाठीं हेळणेनें. श्लोक ३७ ते ४२ पाहावे.

१९ निज अपत्यजना–आपल्या मुलांस.

,, सकळांपरी–सकळांपेक्षां, इतरांपेक्षां.

,, लक्षिति=प्रीतीनें पहातात.

२४ जितचि–जिवंतपणींचीं, नामें=नामाचा–उच्चार कसे तरि परीनें घडलेला; समर्थें=मुक्ति देण्यास समर्थ होत नाहीं. अ० १ च० १ श्लो० ४३ प्रमाणें.

२६ वासनात्यागरीती–वासना (इच्छा) तिचा त्याग (टाकणें) करण्याच्या रीतीनें (योगानें).

२९ देहावसानसमयीं–अंतकाळीं. [अवसान=अंत.]

श्लोक.

३३ प्राणयानसमयीं–अंतकाळीं.

४६ विवशतेंन–विकल झाला असतां.

५० लाहनालीं–लहान लहान.

६९ कांचन औषधी–हलक्या धातूचें सोनें करणारी वनस्पति.

अध्याय २ चरण ३. (पृ० २१७-२२२.)

१ उभयदूत–विष्णूचे आणि यमाचे दूत.

६ निष्पाश–(यमाच्या)पाशांतून मोकळा.

७ अ० १ च० ३ श्लो० १९ ते २६ पहा.

९ शरीरीं–स्थूळ देहांत.

,, सूक्ष्मशरीर–लिंगदेह.

१३ वारदहा–दहा खेपा.

दहा–दहा–पुत्ररूपानें.

१४ स्वकृतानुतापें–आपले कृतीचा पश्चात्ताप झाल्यामुळें.

१८ धर्मघ्न–धर्महानि करणारे, धर्म मोडणारे.

१९ स्मृतिगत–स्मरला, आठवला.

,, म्हणुनि–असें.

,, कथिल–शुक सांगेल.

२० तयाला–दूताला.

२४ विप्रहंता–ब्राह्मणांचा नाशकर्ता.

२८ कर्मतत्व अ० १ श्लो० ४५ पहावा.

,, संचित–पूर्वजन्मार्जित पापपुण्याचा संग्रह (प्रारब्ध नव्हे). १ संचित २ क्रियमाण ३ प्रारब्ध यांच्या व्याख्या कर्मतत्व अध्याय १ श्लो० ४९।५०।५१ पहा. कर्मतत्व अ० १ श्लो० ४६ पहावा.

२९ प्रारब्ध–पूर्वपापपुण्यानुरूप देहास जो भोग नेमिलेला असतो तो.

,, सर्वात्मभावें–श्लोक ५३. (अ० १ च० १) याजवरील टीप पहा.

,, मध्यस्थ–अमित्र व मित्र नव्हेत ते.

श्लोक.

२९ तद्रूप–श्रीवासुदेवरूप.

,, सर्वांचा आत्मा–यावत्प्राणिमात्रांचा व आपला एकच आत्मा असा ईश्वर. [नामसुधा अ० ३ च० २ श्लो० २७।२८ पहा.]

३१ ऐसे हे–(वर सांगितल्या प्रकारचे) विषयांत दोष (आहेत) नसतां (जर दोष नसते तर) भले (ज्ञाते) (त्या विषयांस) कां टाकिती ? विषयांत दोष आहेत म्हणून त्यांचा ज्ञात्यांनीं त्याग केला–असें तात्पर्य.

,, जगन्मोहिनी–जगताला मोह घालणारी.

३२ अतिलंपट–फार लुब्ध.

३३ निगमसार–अ० २ ओंवी २८ पहा:—'तामस पंचभूत सृष्टी। त्या देहीं आत्मत्व दृष्टी। म्हणोनि प्रबळ जिचे पोटीं। तमोगुण ते अविद्या॥'.

,, प्रतीति–निगमसार–अ० २ ओंवी ३२ पहा:—'मी देह ऐसी प्रतीति। शवांत नाहीं हें देखती। मागुती मी देह ऐसें म्हणती। हें अविद्या अवरण॥'.

३४ चिर–फार दिवसांची.

४२ पूर्वार्ध–निगमसार अ० ७ ओ० ६४ पहा:—'विश्वाकार माझें मन। त्याही पुढें चैतन्यघन। तें तों आपण हें अनुसंधान। हृदयीं असावें॥'

४३ ऐक्यसगुणीं–'चरमगुरुमंजरी' श्लोक ७३ पहा.

,, अखंडानंदाचा–न खंड पावणाऱ्या आनंदाचा.

४४ रेखिले–रेखिलेले–सुखें रेखिले–सुखानें भरलेले, केवळ सुखस्वरूप.

श्लोक.

४६ गदांबुज–गदा आणि अंबुज (कमळ)

,, अंबुदसांवळा–मेघाप्रमाणें सांवळा.

,, तडिदंबर–तडित् (वीज) आहे अंबर (वस्त्र) ज्याचें असा.

अध्याय २ चरण ४. (पृ० २२२–२२९.)

२ ज्ञानी भक्त–ज्ञान्यांचे दोन प्रकार पंडितांनीं मानिले आहेत. 'ब्रह्मस्तुति' चरण १ श्लो० ५३।५४.

६ गतभवीं–पूर्वजन्मीं.

१० अजामिळ विष्णुस्वरूप होऊन वैकुंठास गेला. सायुज्यता पावला नाहीं. त्यास जी मुक्ति झाली ती गौण आहे (म्हणजे–सरूपता, समीपता, सलोकता ह्या गौणमुक्ति होत. तशी त्यास झाली) असें म्हणणारांस श्लोक १० पासून १७ हें उत्तर आहे.

,, कैवल्य–निर्गुण.

,, न गणिति–इतर मोक्षास मोक्ष मानीत नाहींत.

,, मुक्ति–अजामिळास झालेली.

,, त्यांला–अव्यक्तमात्रीं–सतत रत जे त्यांला.

,, होती–या क्रियापदाचा कर्ता. क्लेशें कैवल्य त्यांला ते.

हरिजन–ज्ञानी असून भक्त ते. पुनरपि सगुणीं अंतरंगा लाविलें ज्यांनीं ते.

११ समुद्रांत मेघाचा बिंदु मिळतो त्यांत, आणि समुद्रांत गंगा मिळते त्यांत, भेद आहे. पहिलें उदाहरण भक्त नाहींत अशा ज्ञान्यांविषयीं आहे.

श्लोक.

आणि दुसरें उदाहरण ज्ञानी अ- सून जे भक्त अशांविषयीं आहे.

१७ शेषवक्त्राग्निजाळें–शेषाच्या तोंडांतून निघणाऱ्या (विषरूप) अग्नीच्या जाळानें. 'शापवक्त्राग्निजाळें' असा येथें पाठ मानिला तर अर्थ असाः—या श्लोकाचे पूर्वार्धांत अजामिळाची गति वर्णन केली आणि जसे जयविजय शापरूप अग्नीनें जळाले, व काळाचे फेऱ्यांत सांपडले तशी अजामिळाची गति होणारी नव्हे असें उत्तरार्धांत पंडित सांगतात.

१८ वैकुंठ–प्रलयकालीं नाश पावणारच मग त्या ठिकाणीं जाणारे अजामिळाचा मोक्ष महत्वाचा कसा? या शंकेचें उत्तर श्लोक १८ पासून २७ यांत आहे.

१९ विकुंठा–ही रैवत मन्वंतरांतील विष्णूच्या अवताराची म्हणजे वैकुंठाची माता. [भागवत–स्कं० ८ अ० १६].

२४ षड्गुण–ऐश्वर्य, ज्ञान, वैराग्य, धर्म, यश, श्री. 'गीतार्णव' श्लोक ४ पहावा.

२६ द्रष्टा–पाहणारा.

,, कंठरूप–शब्द करितो जो तो कंठ. शब्दापासून आकाश, त्यापासून स्पर्श, त्यापासून वायु इत्यादि क्रम सांगितला आहे, म्हणून शुद्ध मायेच्या योगानें ईश्वरानें धारण केलेले साकाररूपास कंठरूप म्हटलें.

श्लोक.

२९ रचला–बनला, तयार झाला.

३० मोक्षापेक्षक–मोक्षाची इच्छा करणारा.

३२ तीर्थपदानुकीर्तन–तीर्थें आहेत पदीं ज्याच्या अशा विष्णूचें कीर्तन (कथा).

३५ विहंगासननखशिख–विहंगासन (विष्णु) त्यास नखशिखांत व्यापणारें.

३८ निर्णय–'नामसुधा' अ० २ च० १ श्लो० ३०-३६ पहा. अ० २ च० २ श्लो० १-२२ पहा.

५२ अनुष्ठवे–अनुष्ठान करील, आचरील.

५६ श्रोता–ऐकणारा.

,, वक्ता–बोलणारा, सांगणारा.

अध्याय ३ चरण १. (पृ० २२९-२३२.)

२ अवसरीं–वेळीं.

१० शासन–आज्ञा.

२५ यजी–यज्ञ करतो, पूजा करतो.

२८ सकोप–रागानें.

,, सर्वोत्तमतात–हें यमास त्याचे दूतांनीं दिलेलें विशेषण. श्लोक १० पूर्वार्ध पहा. [येथें विष्णूचा किंवा त्याचे दूतांचा संबंध नाहीं. सबब मूळांत दिलेली टीप रद्द समजावी].

,, याचे–यमाचे.

,, तयांतें–यमासच सर्वोत्तमतात असें बोलणारे जे त्याचे दूत त्यांतें.

अध्याय ३ चरण २. (पृ० २३२-२३७.)

४ दिशाधिराजे–दिक्पाळ.

१० भगवदीक्षणपात्र–ईश्वराची कृपापात्र.

१२ तयां–यमदूतांस.

१४ स्वयंभुसुत–हें मनूचें विशेषण समजावें.

२७ जाणसी–वामनकृत 'प्रियसुधा' पहा.

२९ ज्ञानी असून सगुण उपासक नाहीत,

श्लोक.

ते या श्लोकाचे पूर्वार्धांत दर्शविले, आणि सगुणउपासक परंतु जे आत्मा व ईश्वर या दोहोंत भेद नाहीं असें समजत नाहींत, ते या श्लोकाचे उत्तरार्धांत दर्शविले. त्या दोघांसही सद्गति घडत नाहीं असें सांगतात. श्लोक ४२ पहा.

३२ निजात्मपणें–गुरु, देव, आणि आपला आत्मा, एकच आहे असें समजून.

,, स्वचिदात्मता–आपण परमेश्वररूप आहों असा भाव.

३५ उपाधितें–मायाभ्रमातें.

,, तें–जीवेशैक्य.

,, आकळे–कळतें.

३८ अद्वयशास्त्र–सृष्टींत परमेश्वरच भरला आहे, दुसरें कांहीं नाहीं, असें प्रतिपादन करणारें शास्त्र. ['ब्रह्मस्तुति' च० १ श्लो० २४ पहा.]

४२ धर्म–यमधर्म.

,, हा–हें यमाचें दर्शक.

,, तयासि–इतर वैष्णवता मिरवणारास, म्हणजे भेदवाद्यास.

४३ कथियलें–श्लोक १४ पहा.

४६ रिती–रिता (कोरा, रिकामा) याचें बहुवचन 'रितें' या अर्थी रितिशब्द योजिला आहे. 'या श्रवणीं' म्हणजे हरिगुणश्रवणीं. 'पातकि परि' पातकी देखील 'रिती न' अनधिकारी नाहींत. याचें कारण पुढील श्लोक ४७ यांत सांगितलें आहे.

४७ त्याचे–पातक्याचे.

श्लोक.

४७ जेव्हां–दोष जळतील, तेव्हां–अंतिदोष जळोनि जाती यामुळें.

५२ उत्तरार्ध–तन्नामकाला, न जाणोनि (ज्याचें नांव घेतो त्यास न जाणतां) नाम म्हणे. तो नामोच्चार. (नामग्रहण) म्हणवयाचा उच्चार आणि नामसंकीर्तन यांत भेद आहे. नामोच्चाराची व्याख्या उत्तरार्धांत सांगितली आणि कीर्तनाची व्याख्या पूर्वार्धांत सांगितली. आणखी श्लो० ५९ पहा.

५३ स्नेहाब्धि लोटला–(पोटांत) मोठें प्रेम उत्पन्न झालें.

६२ नामद्रुमीं–नामरूप वृक्षाच्या ठिकाणीं.

अध्याय ३ चरण ३. (पृ० २३७-२४२.)

४ कर्मठ–कर्म (वैदिककाम्यकर्म)च आचरणारे, कर्मच प्रधान मानणारे.

१६ महाजन–अ० ३ च० ३ श्लो० ६ यांत वर्णिलेले.

,, दीर्घकामी–फार इच्छा करणारे, आशाळ.

,, पराङ्मुख–मागें फिरलेले.

१९ नश्वरांलागीं–नाश पावणाऱ्यांना. [इंद्रादिक देवांना 'अमर' म्हणतात, पण ते प्रलयकालीं नाश पावणारे होत.]

२० शाश्वत–अक्षय.

२२ परलोकदैविक–स्वर्ग लोकांतील देवांचीं (पदें).

२६ सुतकाम–पुत्राची इच्छा करणारा.

,, पूर्वपक्ष–प्रश्न.

२८ करुनि–केलें असतां.

,, फळें–स्वर्गादि प्राप्ति.

श्लोक.

२८ तदपि–वैदिककर्माचें, स्वर्गादि फळ वेदांनीं सांगितलें आहे तथापि.

,, मागती–मागणारे जे (मागती त्यासचि अपेक्षित फळ–स्वर्गादिक मिळतात. विरक्तांस नाहीं.)

३७ चपेटा–मार, हल्ला.

४१ तदद्वयपणें–त्याच्या ऐक्यभावानें.

४५ मदधीन–माझ्या स्वाधीन.

४७ संकल्प–अ० १ च० ३ श्लो० १७-२५ पहा.

५२ विहित–योग्य.

अध्याय ३ चरण ४. (पृ० २४२-२४५.)

३ तदंघ्रिधूळी–त्याच्या चरणाची धूळ.

८ यातनार्ह–यातना (दुःख) देण्याला योग्य.

२७ भोवती–भ्रमण करतात.

नृहरिदर्पण. (पृष्ठें २४५-२६१.)

१ यांत या प्रकरणाचें तात्पर्य आहे. हें मंगलाचरण 'वस्तुनिर्देशरूप' आहे.

,, व्याघ्रतोकीं–वाघांच्या मुलांना.

२ रमा हृदयांबुजीं–लक्ष्मी ज्याचे हृदयाचे ठिकाणीं वास करिते. ('गोपीगीत' २५, सवत लक्ष्मी ती तुझ्या उरीं–वामन.)

३ विषमकारक–हें कोपाचें विशेषण. वैषम्यकारक, सम नव्हे असा जो. समीं–हें नृहरीचें विशेषण. 'सम मी सकळांभूतीं, न द्वेषी मज न प्रिय ॥' [वामनी गीता.]

,, स्वैरभावें–स्वेच्छेनें.

६ जगत्कल्पना–वामनकृत 'तत्वमाला' श्लोक ११२ पहा.

८ 'अमुक्त स्थळीं'–'नामसुधा' अ० २ वा० स्फु० भा० प० प० ८

श्लोक.

च० ४ श्लोक ११२१३ पहावे. वैकुंठाचे तीन भाग, त्यांतून श्रीभाग मुक्तस्थळ, आणि भू व दुर्गा हे दोन भाग अमुक्तस्थळ, असें पंडितांनीं लिहिलें आहे. अमुक्तस्थळ असे जे पुढें शब्द आले आहेत ते याच अर्थानें सामासिक नाम आहे.

१६ ज्येष्ठ–भागवतकारांनीं जुळे मुलांत मागाहून जन्मलेल्यास ज्येष्ठ मानिलें आहे. परंतु मनुस्मृति याचे उलट आहे. पुराणापेक्षां स्मृति बलवत्तर, म्हणून ज्याचा जन्म पहिला तोच ज्येष्ठ. व्यवहारमयूख पहावा, निर्णयसिंधु पहावा.

१९ मृति–मरण.

४० ही उक्ति कवीची आहे, द्विजाची नव्हे.

४१ भविष्यानुरूपें–श्लोक ४० यांत कवीनें भविष्य दर्शविलें तदनुरूप.

,, वाणी–श्लो० ३९ यांतील उक्ति.

,, तर्जनाभर्जनालागिं–अपकारार्थक भाषणालागीं, निर्भर्त्सनेला. त्या द्विजानें प्रऱ्हादास दुष्ट भाषण बोलण्यास कमी केलें नाहीं–असा भावार्थ.

५२ स्पृहा–इच्छा.

५५ तंतू–वामन 'चित्सुधा' श्लोक २० आणि 'चरमगुरुमंजरी' श्लोक १३ पहा. (दसोडी जें० इत्यादि.)

,, गुरुवराच्या–गुरुवर्य याची व्याख्या वामन 'चरमगुरुमंजरी' श्लोक ९ यांत पहा (सुवर्णीचां० इत्यादि.)

श्लोक.

५५ श्रुति निकर जडीं ब्रह्म दावी–याचा स्पष्टार्थ 'चरमगुरुमंजरी' श्लोक ६।७।८ पहा (न होतं०) श्लोकार्थ. जों (पर्यंत) नर गुरुवराच्या पदरजीं लोळेना (लोळणार नाहीं) तोंपर्यंत हरी तंतूचे आड त्रिभुवनपटाचा पदर असे–जगदानंदकर (अशीं) जीं त्या त्याच्याच करजीं (गुरूच्या करपल्लवांनीं नखाग्रांनीं) श्रुति निकर जडीं ब्रह्म दावी. (मग तें ब्रह्म कळल्यावर) देही (असा)ही विदेही (आणि) अमर (जन्ममृत्युरहित) होय.

६५ भाला–शस्त्रविशेष.

,, नभाला–आकाशाला–भा (तेज) आणि तम (अंधःकार) लागते कीं (स्पर्श करुं–दूषित करूं शकतात काय?) लागत नाहींत. तद्वत् प्रल्हादास शस्त्रें लागलीं नाहींत.

७१ भृगुकुमार–शुक्राचार्यांचे पुत्र (शंड आणि अमर्क.)

७५ शिराणी–लाभ, कौतुक.

७८ हरिसेवाविभवधी–हरिसेवा करणें या ऐश्वर्यातच ज्याची बुद्धि रमली तो.

८१ निजपणीं–आत्मस्वरूपीं, आत्मस्वरूपाचे ठिकाणीं असणारा.

,, जपणी–ध्यास.

,, जड दाविना–जड दावित नाहीं. (जडाचें सत्यत्व मनास भासूं देत नाहीं. जड आणि आत्मा यांतील भेदाची विस्मृति पडत नाहीं–असें तात्पर्य).

श्लोक.

९६ रक्षपाळ–राक्षसांचें रक्षण करणारा.

९७ विश्वपटीं–विश्वरूप वस्त्रामध्यें.

११५ जाणो खड्गदक्षणा–दक्षिण(उजव्या) हस्तांतील खड्गा(तरवारी)प्रमाणें, वधादि कर्मांविषयीं समर्थच जणों.

,, श्रीखंड–चंदन.

,, चंद्ररश्मी–चंद्राच्या किरणांप्रमाणें शीतल.

१२१ त्रिलोकी–तीन लोकांचा समुदाय.

१२२ कबर्य्यंबर–कबरी (वेणी)+अंबर(वस्त्र).

१३० कृपापुंजराशी–हे कृपेच्या सागरा. (येथें पुंज व राशि हे शब्द समानार्थक आहेत).

१३८ करी–या क्रियापदाचा कर्ता काम. या श्लोकांत प्रार्थना म्हणजे मागणें नसून पुढील १३९ श्लोकांत 'काम मनिं न उपजे असें करीं' अशी प्रार्थना आहे. आणि काम उद्भवला असतां तो तनू प्राण सर्वेंद्रियां भारी कष्ट "करी" आणि तेज, लज्जादिकांही हरी. असे कामाचे दुर्गुण या श्लोकांत (१३८)प्रल्हादानें वर्णिले आहेत. 'कामात्संजायते क्रोधो०' या गीताश्लोकावरील वामनी टीका (यथार्थदीपिका) पहावी. सर्व पातकास मूळ काम आहे म्हणून कामाचा (इच्छेचा) उद्भव नसावा असें मागणें मागितलें.

१४० लाहो–छंद.

१४५ स्पृहाद्वेषत्यागें–सुखाची प्रीति आणि दुःखाचा द्वेष टाकिल्यानें.

,, योग–मुख्य तोची योग । कीं ईश्वरी

श्लोक.

चित्तसंयोग ॥ ['यथार्थदीपिका' अ० २ ओवी १०९८ पहा.]

१४५ भलता–कोणीही मनुष्य.

„ प्रारब्धाची–वर लिहिलेला. 'कर्मतत्व' अ० ३ श्लो० ९ पहा.

१४६ जहीं–विश्वांत, जगांत.

„ चिद्रूपा–आत्म्यास, ईश्वरास. ['ब्रह्मस्तुति' च० २ श्लो० २१५ चतुर्थपाद.]

„ कपटपट तंतूस–तंतु सत्य आणि पट मिथ्या; तंतुरूप ईश्वर, आणि पट हें जग, पट मिथ्या म्हणून त्यास कपटपट म्हटलें. ['चित्सुधा' श्लो० २० पहा.]

„ जग हें भुजग–हरि हा पुष्पांचा हार, हार सत्य, आणि भुजग ही भ्रांति जड जगा भुज गा. चिद्रूप, हरि सुमनहारा पाहें. जग आहे हें जड आहे असें मानूं नकोस. चिद्रूप (ईश्वररूप) आहे असें मान म्हणजे तें जग नव्हे तर हरि (ईश्वर) आहे. चिद्रूप म्हणजे पुष्पांचा हार. त्यास जड म्हणणें म्हणजे हारास सर्प म्हणणें होय. ['ब्रह्मस्तुति' च० २ श्लो० ११६.]

गजेंद्रमोक्ष. (पृष्ठें २६२–२६६.)

६ स्वशरण–निजाश्रय.

८ यान–वाहन (विमान).

वामनचरित्र–(पृष्ठें २६६–२७०.)

३ विशारद–जाणता.

१७ पातकपंजरीं–पापरूप पिंजऱ्यांत.

२१ सर्वस्वदानीं–सर्व ऐश्वर्याचें दान करण्यांत.

श्लोक.

३८ जयवाद्यनाद–जय झाला म्हणजे जीं वाद्यें वाजवितात त्यांचा शब्द.

वामनचरित्र (पृष्ठें २७०–२७१.)

२ दुणावला–दुप्पट झाला.

३ अंतवंत–नाश पावणाऱ्या.

४ न्यास–त्याग.

„ कर्मशेंडी–कर्मरूप शेंडी.

भागवतरामायण (पृष्ठें २७२–२८४.)

६ अमृतसंतृप्त–अमृतानें तृप्त.

१२ लब्धमाना–असणारी.

१७ मृतदेह–मेलेलें आहे शरीर ज्याचें तो. (असें विशेषण योजण्याचें कारण त्या राक्षसास शिर नव्हतें.)

९ पवनजसह–मारुतीसहित.

१० वियोगाश्रमातें–वियोगरूप कष्टाला किंवा वियोगाच्या कष्टाला.

३३ निर्विकारी–विकाररहित.

„ दुरतिकाळीं–संकटाच्या वेळीं.

कृष्णजन्म. (पृष्ठें २८५–२८९.)

१ बद्ध–बांधलेला, गुंतलेला, मुक्त नव्हे तो.

५ विमलदृष्टि–पवित्र किंवा स्वच्छ दृष्टि आहे ज्याची तो.

१२ सद्यःप्रसूतजनबालकरूप–नुकत्याच प्रसवलेल्या मनुष्याच्या लेंकराप्रमाणें.

बालक्रीडा. (पृष्ठें २९२–३०३.)

२८ पूर्वोक्तचेष्टाकृतदोष–पूर्वी सांगितलेल्या चेष्टांनीं केलेला दोष.

४२ विरमते–थांबते.

५७ दापी–दाबी.

७६ नेदिति–देत नाहींत.

„ लुंचुनि–उपटून.

९३ एकार्णवामाजि–एका समुद्रामध्यें.

श्लोक.

गोरसहरण. (पृष्ठें ३०५-३०७.)

९ मोहरीनें–मुरलीनें.
,, छेद–भोंक.
,, अंबर–वस्त्र.
१३ मथन–मंथन, घुसळणें.
२१ क्षुधाक्रोधयोगें–भुकेनें आलेल्या रागाच्या योगानें.

वनसुधा. अ० ३ (पृष्ठें ३१९-३२३.)

५ शिशुवृंद–मुलांचा मेळा.
८ भवांबुधिमज्जना–संसारसमुद्रांत बुडणें.
,, साधकशेखर–साधकांमध्यें श्रेष्ठ.
१५ स्वसंस्कारशेषें–आपले संस्कार शिल्लक राहिल्यामुळें.
१६ अतिवामन–फार खुजे.

ब्रह्मस्तुति. (पृष्ठें ३२८–४०४.)

चरण पहिला. (पृ० ३२८-३४७.)

८ सुवेषविधिनें–चांगला वेष धरून.
३१ ज्ञानगर्वनिधि–ज्ञानगर्वाचे साठे, मोठे गर्विष्ठ.
४३ हरिकृपाख्यसुधा–हरिकृपा नांवाचें अमृत.
६५ श्रमगणसमृद्धी–कष्टांची विपुलता.
१०९ विघरोनि–विरून.
११० तदात्मकतेस–तद्रूपतेस, ईश्वरत्वाच्या भावास.
१११ पुरे–पुरतें.
,, अगुणीं–निर्गुण ईश्वरांत.
११३ सचेतन–चेतनागुणानें युक्त. एखादें काम करण्याविषयीं उद्युक्त.
११९ स्वानुभूतिस्वरूप–(स्व + अनुभूति + स्वरूप) स्वानुभवाचें स्वरूप, जीवच ईश्वर आहे अशा अनुभवाचें स्वरूप.

श्लोक.

१२८ अवस्थात्रयातीत–(अवस्था+त्रय+अतीत) तिन्ही अवस्थांहून वेगळा.
१४२ वारिताहे–निवारण करतो.
१५७ वैधव्यस्फुरणें–विधवापणाची आठवण होऊन.
,, क्षौरार्थ–केशवपनाकरितां.
१६४ आत्मसुधासमृद्धी–आत्मस्वरूपाचें ज्ञान हेंच अमृत त्याची विपुलता.
१९० सकलात्मक–सकळांचा आत्मा असा.
,, शरीरी–शरीर धारण करणारा.
१९३ त्रिचरणीं–तीन चरणांनीं, वामनानें (विष्णूनें) तीन चरणांनीं जसें त्रैलोक्य व्यापिलें तसें वामनानें (कवीनें) या तीन चरण ब्रह्मस्तुतीनें त्रैलोक्य व्यापिलें–असा भाव.

चरण दुसरा. (पृ० ३४७-३८६.)

२९ शंकले–शंकायुक्त झाले.
३२ लेखवेना–वर्णन करवत नाहीं.
३४ रोमकूपविवरीं–रोम (शरीरावरील केंस) हेच कूप आणि विवरें यांच्या ठिकाणीं.
८० नरहेतुभूतें–नरहेतूला साधन झालेलीं अशीं.
९६ माले–राहिले.
११३ कर्मतत्वीं–'कर्मतत्व' या नांवाच्या (वामनानें लिहिलेल्या) काव्यांत. 'ब्रह्मस्तुति' लिहिण्यापूर्वीं पंडितांनीं 'कर्मतत्व' लिहिलें होतें असें यावरून दिसतें.
,, 'श्रीकर्मतत्वा'ख्यनिबंधकारें–कर्मतत्व नांवाच्या निबंध लिहिणारानें (वामनानें).

श्लोक.

१९५ तत्वकथानुवादें–तत्वकथेचा अनुवाद करतांना.

१२९ सदाद्वयचिदात्मसुखस्वरूपी–(सत्+अद्वय+चित्+आत्मसुखस्वरूपी) परमेश्वराचें स्वरूप सत् (खरें) अद्वय (एकच) चित् (जाणणारें) आत्म (आत्मरूप व सुखस्वरूप) असें आहे.

१४८ धर्मरक्षा–धर्माचें रक्षण.

१५३ ब्रह्मात्मतास्फुरणरूपिणि–आत्मा ब्रह्मरूप आहे अशा स्फुरणानें युक्त.

,, देहात्मतास्फुरणरूपिणि–आत्मा देहरूप आहे अशा स्फुरणानें युक्त.

१५४ अनीशत्व–ईश्वरत्व नव्हे तें.

,, ईशत्व–ईश्वरपणा.

१५९ पराख्य–'परा'नांवाची.

१८२ मृत्पिंड–मातीचा पिंड (गोळा).

१८६ सुखाभास–सुखाचा आभास (भ्रांति.)

१८७ भयकंपकारी–भय आणि कांप उत्पन्न करणारा.

२१४ प्रकाशक–प्रकाशविणारा.

,, वृत्तिविहीन–वृत्तिविरहित.

२२५ वृत्तिप्रतीति–वृत्तीचा अनुभव.

२३३ व्यर्थनानात्मशंका–अनेक जीव भिन्न भिन्न आहेत ही शंका व्यर्थ आहे.

२३६ कुंभमिथ्यात्व–मडक्याचें असत्यपण.

२३८ अक्षर–क्षय न पावणारा. जगाचा नाश होतो, तुझा (ईश्वराचा) नाश नाहीं. जग उत्पन्न होतें, कांहीं वेळ रहातें व मग नाश पावतें म्हणून तें क्षर. तुला आदि अंत नाहीं. तूं अक्षय आहेसच म्हणून तूं अक्षर.

,, अनित्यवृंद–नित्य नव्हे असल्या वस्तूंचा समुदाय.

श्लोक.

२५८ किमपि तों–तोंपर्यंत (जोंपर्यंत हार हा सर्प आहे असा भास मनाला झाला आहे तोंपर्यंत) किमपि (कांहींतरी) सुख होईल काय? (होणार नाहीं) तर उलट–भय सर्पनिरीक्षणें–म्हणजे सर्प पाहिल्यामुळें भय मात्र वाटेल–असा भाव.

२६६ विषयनिर्मित–विषयांनीं उत्पन्न केलेलें.

२६८ त्रिगुणवात–सत्व, रज, तम, या तीन गुणांची वात (दिव्याची).

,, घृतकामना–कामना (इच्छा) हें घृत (तूप.)

२८८ सकळजीवचिदैक्य–सकल जीवांचें परमेश्वराच्या स्वरूपाशीं ऐक्य.

३०३ उदकभासक–उदकाचा भास करणारा.

३५२ ब्रह्मार्कबोधीं–ब्रह्मरूप सूर्याचा बोध (उदय) होण्यासाठीं.

,, उदयाद्रि–उदयाचळ. (विद्या हाच त्याचा उदयाचळ आहे.)

३६८ मोक्षनित्यपण–मोक्षाचें (मुक्तीचें) नित्यपण (शाश्वतत्व).

४३० परनिष्ठ–अत्यंत भक्ति ठेवणारे.

,, भेदीं–द्वैतावर.

४४४ सत्संप्रदाय–साधूंची रीत.

चरण तिसरा. (पृ० ३८६-४०४.)

२ जिज्ञासु–जाणण्याची इच्छा करणारा.

७ आत्मगत–आत्म्याविषयीं (परमात्म्याविषयीं) मात्र.

,, अन्यविरक्ति–इतर पदार्थांविषयीं विरक्ति.

११४ उत्तीर्णता पावसी–उतराई होशील.

श्लोक.

हरिविलास. (पृष्ठें ४०५–४४४.)

अध्याय पहिला. (पृ० ४०५-४११.)

२ मधुनियां–गर्वरहित करून.

२३ इंद्रनीलद्युति–इंद्रनील मण्यासारखी कांति आहे ज्याची असा (कालिय).

३० जीवविलें–जिवंत केलें.

४० जगजीवन–जगाचें वांचणें, (जगास उपयोगी पडणें) विषामुळें जीवनाचा उपयोग प्राण्यांस होत नव्हता याकरितां तींतील जीवन असून नसून सारखेंच होतें.

४१ नदिं–नदांच्या ठिकाणीं, यमुनानदीवर.

४६ गहन–मोठा, खोल.

४७ उचंबळलें–वर उडालें.

अध्याय दुसरा. (पृ० ४११-४१८.)

१७ उत्पातधाकें–उत्पातांपासून उत्पन्न झालेल्या भीतीनें.

२४ बाळवृद्धादिसेना–लहान मोठे गोपाळ.

२९ तीव्र–अत्यंत.

३३ धरणीतळमंडनें–धरणीतळाचीं भूषणें.

४२ उरगबंधन–सर्पाचें वेष्टण.

५६ निरूपिलें–सांगितलें.

५७ उकलि–काढले.

६० वमतसे–ओकला.

६२ रज्जुसर्प–रज्जूवर (दोरीवर) सर्पाचा भास (तसा ईश्वरावर विश्वाचा भास.)

अध्याय तिसरा (पृ० ४१८-४२२.)

१ मर्दिला–गर्वहीन केला.

३२ कामरूप–सुंदररूपाचा, सुंदर.

४० अंतक–नाश करणारा.

श्लोक.

४४ तांडवाचा–नृत्याचा.

,, जन्मांतक–जन्माचा अंत करणारा. जन्म मृत्यु चुकवणारा.

,, त्रिभुवनेश्वरी–त्रिभुवनाची मालकीण.

अध्याय चवथा. (पृ० ४२२–४२७.)

८ स्वगुरुदेव–आपला गुरु व देव.

१० अलोकप्रकारांत–अलौकिक प्रकारांत.

१८ विषमता–विपरीतपणा.

१९ खलमद–दुष्टाचा गर्व.

,, दंडमिसें–शिक्षेच्या निमित्तानें.

,, त्वदनुग्रह–तुझी कृपा.

